# माझा नातू माझी वंश वेल

प्रकाशित:

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© पुनरारंभ

**website:** [http://www.rajratna.co.in](http://www.rajratna.co.in) **Email:** [ratnakar.wani@rajratna.co.in](mailto:ratnakar.wani@rajratna.co.in)

# माझा नातू माझी वंश वेल

वारसा हक्काने आपल्यात काही तरी गुण आलेला असतो. माझ्या नातवंडाना माझ्या बद्दल जास्त माहित नसेल. माझा वटवृक्ष साधा सुधा असेल पण पुढील पिढीसाठी तो दिप स्तंभ असेल. माझी वंशावळ किती छान आहे. साखळी साखळीने त्यात गुंतून पडणे मला तरी खूप आवडते. जन्मजन्मातून मी वहात आहे, वाहत जाणार आहे हा परमेश्वराचा कृपा आशीर्वाद आहे. स्त्रीला जन्मापासून अनेक भुमिकातून जावे लागते. बालपणी सुंदर लाडिक मुलगी, नंतर कर्तव्य तत्पर संसाराची जबाबदारी पेलणारी पत्नी, लाडक्या बाळावर सुसंस्कार करणारी त्याचे योग्य संगोपन करणारी माता व सर्वात सुंदर व प्रेमळ ह्दयाची, हळव्या मनाची आजी. माझा लाडका, हुषार व खेळकर नातू आर्यन मुळे मी आजी झाले. त्याच्या बाललीला मध्ये मी माझ्या मुलांचे बालपण जे त्यावेळी कामाच्या व्यापामध्ये अनुभवायचे राहून गेले ते अनुभवते आहे.

पूर्वी सहजच आजीपण अनुभवायला मिळायचे व आनंद घेता येत होता. आम्ही त्या काळी नोकरी निमित्त गावापासून लांब गेलो होतो. सासरी माहेरी भरपूर गोतावळा असल्याने बरेचदा गावी जाणे व्हायचे तेव्हा व मुलांना आजी आजोबांचे प्रेम मिळायचे, सहवास लाभायचा. प्रत्येक बालकाला आपले आजोळ प्रिय असते. आज देखिल मुले आजी आजोबांच्या प्रेमळ सहवासाची आठवण काढतात. पण हल्लीचा काळ तर फारच बदलला आहे. नोकरी व्यवसाया निमित्त मुले खुप लांब परदेशी सुध्दा गेलीत. काही मनाने तसेच शरिराने पण दुरावलीत. त्यामुळे नातवंडेही लांब गेली.

सुदैवाने आमचा ३ वर्षाचा नातू आर्यन पुण्यातच आहे. त्याला शाळेमुळे आमचेकडे येणे जमत नाही. पण महिन्यातून ३३ वेळेस आमचे कडे येतो. जेव्हां जेव्हां येतो खूप दांडगाई करतो, खेळतो, आमचेकडून लाड करवून घेतो. आम्हाला त्याचेशी खेळण्यात खूप आनंद मिळतो. त्याचे कोड कौतुक करण्यास मिळते. आम्ही खूप खेळतो. तो आजी होतो मला आर्यन व्हायला सांगतो. घडीभर आजी होउन माझी नक्कल करतो, माझे लाड करतो. मी औषध घेतांना माझे हात धरत म्हणतो, “घाबरू नको. मी आहे तुझ्याजवळ.” त्यावेळेस त्याच्या डोळयात माया प्रेम ओथंबून वाहत असते. मी पण आर्यनची भुमिका करते. मग आम्ही घरात जिन्यामध्ये बसुन शाळा शाळा खेळतो. नेहमी प्रमाणे कधी तो आर्यन मी टिचर तर कधी मी आर्यन तो टिचर होतो. शाळेतील सर्व घटना व शिकविलेले सांगतो व तसे सर्व माझेकडून करून घेतो. शाळा खेळून झाल्यावर जिन्यातच सर्व खेळणी व इतर वस्तू मांडतो

व मॉल मॉल खेळतो. भाजी आणतो. सर्वांची किंमत त्याच्या भाषेत “टेन रूपीज” (दहा रूपये) सांगतो. आम्ही वस्तू घेतो व परत देतो असा लटका व्यवहार करतो. यात त्याला फार मजा वाटते.

मला १५वर्षापासून मधुमेह आहे पण त्याच्या थोडयाशा सहवासाने का होईना मला खूप फरक जाणवतो. त्याला पण आमचे सहवासात खूप आनंद मिळतो. जणू आम्ही एकमेकांसाठी टॉनिकच आहोत. आजी आजोबांच्या सहवासात नातवंडे आनंदी व बुध्दीवान होतात. मनुष्य स्वभावच आहे जे सहजा सहजी प्राप्त होते त्याची किंमत नसते परंतु जे मिळत नाही त्याची खूप ओढ लागते. आर्य नला खराडीचे घर म्हणजे खराडीच्या आजोबांचे घर खूप आवडते. मला सारखे त्या घरी घेउन जा असे म्हणत असतो. आम्हाला त्याचा सहवास खूप कमि लाभतो. पण तो जेव्हां जेव्हां आमचेकडे असतो त्या काळात आम्हास खूप मोठा परम आनंद मिळतो. निघतांना त्याचे डोळे पाणावतात ते नेहमी माझ्या डोळयापढे येतात. तो गेल्यावर त्याने घरभर पसरलेली खेळणी आवरतांना ती खेळणी मला निर्जीव वाटायला लागतात.

त्याचे आमचे जन्मजन्मांतरीचे नाते या घराशी जोडले गेले आहे. माझी वंशवेल अशीच बहरत राहो हीच प्रभु चरणी इच्छा.